जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 NOV 2024
पुण्यनगरी

# सर्वस्तरातून उत्स्फूर्त मतदान



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी वाठार तर्फ वडगाव येथे मतदान केले.

कोल्हापूर : विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी जिल्ह्यात मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत सुरु होते. यामध्ये नवमतदार, जेष्ठ नागरिक, दिव्यांग तसेच तृत्तीयपंथी मतदारांनीही उत्साहात मतदान केले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांनी कसबा बावडा येथील भाऊसो महागावकर विद्यामंदिर येथे मतदान केले. तसेच पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे यांच्यासह विविध विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मतदानाचा हक्क बजावला. जिल्ह्यातील प्रथमच मतदानाचा हक्क बजावणाऱ्या युवा मतदारांचा उत्साह अवर्णनीय होता तर जिल्ह्यात वैशिष्ट्यपूर्ण संकल्पानांवर आधारित १४३ थिमॅटीक मतदान केंद्रे उभारली आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 NOV 2024
लोकमत

# 'सेमी कंडक्टर फोटो कॅटालिस्ट' निर्मितीस यूके डिझाईन पेटंट

## शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापकांचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क



अविराज कुळदीप

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागातील डॉ. अविराज कुळदीप, डॉ. राहुल माने, डॉ.किशोर खोत, डॉ. सुहास मोहिते, डॉ. के एम. गरडकर यांच्या ' वेस्ट टू वेल्थ ' या संकल्पनेवर आधारित 'सेमी कंडक्टर फोटो कॅटालिस्ट' निर्मितीस यूके डिझाईन पेटंट जाहीर झाले.

जुलै २०२३ मध्ये डॉ. कुळदीप यांची भारत सरकारच्या स्वच्छता सारथी फेलोशिपसाठी निवड झाली होती. त्यामध्ये त्यांनी पंचगंगा नदीचे दूषित पाणी, त्याचे कोल्हापूर व इचलकरंजी शहरांमधील प्रदूषणाचे उगमस्थान व प्रदूषित पाण्यावर 'सेमीकंडक्टर फोटोकॅटालिस्ट'चा उपाय यावरती माहिती सादर केली होती.



राहुल माने



किशोर खोत



सुहास मोहिते



के एम. गरडकर

याच कार्यासाठी त्यांना यूके सरकारचे पेटंट मिळणे ही शिवाजी विद्यापीठ व कोल्हापूरसाठी अभिमानाची बाब आहे.

जागतिक सेमीकंडक्टर क्षेत्राच्या वाढीमध्ये भारताची मोठी भूमिका आहे. या कार्यासाठी कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के, डॉ. प्रमोद पाटील, डॉ . व्ही. एन.शिंदे, डॉ.के. डी सोनवणे, डॉ.जी. एस. राशिनकर यांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 NOV 2024
सकाळ



कोल्हापूर : मंगळूर येथे झालेल्या आंतरविद्यापीठीय क्रॉसकंट्री स्पर्धेत यश मिळवलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या महिला व पुरुष संघासोबत मान्यवर उपस्थित होते.

# आंतरविद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे यश

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : मंगळूर येथे झालेल्या अखिल भारतीय विद्यापीठ क्रॉसक्रंटी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष व महिला संघाने उल्लेखनीय कामगिरी केली.

स्पर्धेत पुरुषांमध्ये प्रधान किरुळकर याने वैयक्तिक दुसरा, तर अभिषेक देवकाते याने तिसरा क्रमांक पटकाविला, तर सांघिकमध्ये विद्यापीठ संघाने ८९ गुणांची कमाई करित चौथा क्रमांक पटकाविला. सांघिकमध्ये अन्य खेळाडूंमध्ये प्रवीण कांबळे, उत्तम पाटील, अंकुश हाके, राहुल चव्हाण यांचा समावेश आहे. तर मुलींमध्ये सृष्टी रेडेकर हिने वैयक्तिक गटात पाचवा, तर महिला संघाने ६४ गुणांसह तिसरा क्रमांक पटकाविला. संघात वैष्णवी मोरे, वैष्णवी रावळ, गायत्री पाटील, वैष्णवी सावंत, सानिका नलवडे यांचा समावेश आहे.

संघांना प्रा. रामा पाटील, डॉ. सविता भोसले, प्रा. प्रकुल पाटील मांगोरे यांचे मार्गदर्शन, तर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एम. शिंदे, क्रीडा विभागप्रमुख डॉ. एस. व्ही. बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.